# कळवा वाहतूक उप विभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसूचना

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.deptraffic@mahapolice.gov.in

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ 239 /२०२४

दि. 12/११/२०२४

## –: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :–

ज्याअर्थी, कळवा वाहतूक उपविभागाचे हद्दीत **विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४** चे अनुषंगाने दिनांक **१३/११/२०२४ रोजी. प्रचार सभा मा. व्हि.आय.पी. मुव्हमेंट तसेच कार्यक्रम आहेत.** त्यामुळे सदर कार्यक्रमाचे ठिकाणी वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आग जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी**, मी पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढील प्रमाणे अधिसुचना जारी करीत आहे:

**प्रवेश बंद–** १) घडयाळ चौक कडुन कळवा नाक्याकडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **घडयाळ चौक** येथे **"प्रवेश बंद"** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग–** सदर वाहने घडयाळ चौक – कळवा हायस्कुल – बुधाजी नगर चौक मार्गे ईच्छीत स्थळी जातील.

**प्रवेश बंद–** २) पारसिक सर्कलकडुन कळवा नाक्याकडे जाणाऱ्या ६ चाकी व जड अवजड वाहनांना **पारसिक सर्कल** येथे **"प्रवेश बंद"** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग–** सदर वाहने पारसिक सर्कल – गॅमन जक्शंन – खारेगांव टोलनाका मार्गे ईच्छीत स्थळी जातील.

**प्रवेश बंद–** ३) नवी मुंबई बेलापुर रोडने ऐरोली – पटणी मार्गे विटावा जकात नाका – कळवा शिवाजी चौकातुन ठाण्याचे दिशेने येणाऱ्या ६ चाकी व जड अवजड वाहनांना **पटणी** येथे **"प्रवेश बंद"** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग–** सदरची जड अवजड वाहने पटणी येथुन डावीकडे वळुन ऐरोली – मुलुंड – आनंद नगर जकात नाका – पुर्व द्रूतगती मार्गे ईच्छीत स्थळी जातील.

**प्रवेश बंद–** ४) खारेगाव – कावेरीसेतु कडुन कळवा नाक्याकडे येणारी तीन चाकी व चार चाकी वाहने यांना **कावेरीसेतु** येथे **"प्रवेश बंद"** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग–** सदरची वाहने कावेरीसेतु – बाली टॉवर – रेल्वे स्टेशन रोड – राणा टॉवर – घडयाळ चौक – कळवा हायस्कुल – बुधाजी चौक मार्गे ईच्छीत स्थळी जातील.

सदरची वाहतूक नियंत्रण अधिसुचना ही दिनांक १३/११/२०२४ रोजी १६:०० पासुन ते रात्रौ २२:३० वा. पर्यंत अंमलात राहील.

सदरची वाहतुक अधिसुचना ही पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रूग्णवाहिका व निवडणुकीची वाहने तसेच इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू होणार नाही.

( पंकज शिरसाट )
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर

प्रति,

जिल्हा प्रसिध्दी अधिकारी, ठाणे
२/– सदरची अधिसुचनेस प्रसिध्दी देणेस विनंती आहे.

Scanned with OKEN Scanner
CamScanner

**प्रत माहितीसाठी सादर,**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर

मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर

मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर

मा. जिल्हाधिकारी, ठाणे

मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे

पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–१, ५, वि.शा. ठाणे

**प्रत कार्यवाहीसाठी :–**

प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे

परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालिका, ठाणे.

नियंत्रण कक्ष अधिकारी, ठाणे

**प्रत** :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर

२/– सदर अधिसूचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

**प्रत** :– समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे

२/– सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

**प्रत** :– संबंधित सपोआ वाहतूक विभाग, पोलीस निरीक्षक, वाहतूक उपविभाग, ठाणे शहर.

Scanned with OKEN Scanner

CamScanner